जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

पुणे पोलीस
Pune Police

**प्रेसनोट क्रमांक - ४३७ दिनांक - १५/१०/२०२४**

स्वारगेट पोलीस स्टेशन, पुणे शहर

## गाड्यांच्या काचा फोडुन लॅपटॉप चोरी करणारी आंतरराज्यीय टोळी केली जेरबंद

स्वारगेट पोलीस स्टेशन गुन्हा रजि नं ४४१/२०२४ भा.न्या.सं.कलम ३०३(२),३२४(४)प्रमाणे गुन्हा दाखल असुन दाखल गुन्हयातील फिर्यादी यांनी त्यांची फॉरच्युर्न गाडी एम एच १२ एफ. पी. ९९९३ हि रोडचे कडेला लॉक व पार्क करुन ठेवली असता कोणीतरी अज्ञात इसमाने त्यांचे गाडीची काच फोडुन गाडीचे नुकसान करुन फिर्यादी यांचे मालकीचा १,००,०००/- रु.कि.चा ॲपल कंपनीचा लॅपटॉप, ॲपल कंपनीचा एअर पॉड असलेली बॅग त्यांचे संमतीशिवाय लबाडीच्या इरादयाने चोरून नेल्याने त्यांनी अज्ञात इसमांविरूध्द तक्रार दिल्याने नमुद गुन्हा नोंद करण्यात आला होता.

सदर गुन्हयातील आरोपींचा शोध घेणेबाबत स्वारगेट पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री.युवराज नांद्रे यांनी स्वारगेट पोलीस स्टेशनकडील तपास पथकातील अधिकारी व अंमलदार यांना आदेशित केले होते त्यावरुन तात्काळ स्वारगेट पोलीस स्टेशन कडील तपास पथकाचे सहा.पोलीस निरीक्षक चांगदेव सजगणे, पोउपनिरी रविंद्र कस्पटे, व पोलीस अंमलदार यांचे मदतीने गुन्हयातील लॅपटॉपचा शोध घेतला असता सदरचा लॅपटॉपचे लोकेशन बेंगलोर याठिकाणाचे आल्याने लागलीच बेंगलोर पोलीस यांना संपर्क करुन नमुद व्यक्तीस ताब्यात घेण्यास सांगितल्याने त्यांनी त्यास ताब्यात घेतले होते. त्यावरुन लागलीच वपोनि श्री.युवराज नांद्रे यांनी वरिष्ठांची परवानगी घेवुन तपास पथकातील सपोनि चांगदेव सजगणे, पोलीस अंमलदार फिरोज शेख व सुजय पवार यांना बेंगलोर येथे रवाना केले होते.

सदर पथकाने बेंगलोर येथे जावुन इसम नामे सुरेश कुमार पांडुरंगन सेरवई वय ५० वर्षे रा. रामजीनगर पुंगनुर ता.श्रिरंगम जि.त्रिचापल्ली तामिळनाडु यास सदर ठिकाणाहुन दोन लॅपटॉप सह पुढील तपासकामी ताब्यात घेवुन स्वारगेट पोलीस स्टेशन येथे घेवुन आले सदर आरोपीस दाखल गुन्ह्यात अटक करुन पोलीस कोठडी दरम्यान त्याचेकडे तपास केला असता त्याने त्याचे ०२ साथीदारांसह मिळुन पुणे शहरातील वेगवेगळया पोलीस स्टेशन हद्दीमध्ये एकुण ११ वाहनांच्या काचा फोडुन ११ गुन्हे केल्याचे निष्पन्न झाले आहे. तसेच दाखल गुन्हयातील एकुण १,५०,०००/- रु. किं.चा ॲपल कंपनीचा व डेल कंपनीचा लॅपटॉप जप्त करण्यात आला आहे. सदर तपासादरम्यान निष्पन्न झालेले गुन्हे पुढीलप्रमाणे.

| अ क्र | पोलीस ठाण्याचे नाव | उघडकीस आलेले गुन्ह्यांची संख्या |
|---|---|---|
| १ | स्वारगेट पोलीस ठाणे | ०५ |
| २ | खडक पोलीस ठाणे | ०२ |
| ३ | चंदननगर पोलीस ठाणे | ०२ |
| ४ | डेक्कन पोलीस ठाणे | ०१ |
| ५ | येरवडा पोलीस ठाणे | ०१ |

## आरोपींचा पुर्व अभिलेख

| अ.क्र. | आरोपीचे नाव व पत्ता | पोलीस स्टेशन | गुन्हा रजि नं व कलम |
|---|---|---|---|
| १) | सुरेश कुमार पांडुरंगन सेरवई वय ५० वर्षे रा.रामजीनगर पुंगनुर ता श्रिरंगम जि त्रिचापल्ली तामिळनाडु | १) धारावी पोलीस स्टेशन मुंबई महाराष्ट्र<br>२) कुर्ला रेल्वे पोलीस स्टेशन मुंबई महाराष्ट्र<br>३) कुर्ला रेल्वे पोलीस स्टेशन मुंबई महाराष्ट्र | १) ११७/२०१७ भा द वि कलम ३९२,३९५,३४<br>२) २३२१/२०१८ भादवि कलम ३७९,३४,<br>३) २६५३/२०१८ भादवि कलम३७९,३४ प्रमाणे |
| २) | सेंथील कुमार महालिंगन वय ४० वर्षे रा | १) कुर्ला रेल्वे पोलीस स्टेशन मुंबई महाराष्ट्र | १) २३२१/२०१८ भादवि कलम ३७९,३४, |

सदरची कामगिरी ही मा.अप्पर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, पुणे श्री.प्रविणकुमार पाटील मा.पोलीस उप-आयुक्त,परि.२पुणे श्रीमती स्मार्तना पाटील,मा.सहा.पोलीस आयुक्त, स्वारगेट विभाग, पुणे श्री. राहुल आवारे यांचे मार्गदर्शनाखाली स्वारगेट पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. युवराज नांद्रे यांचे आदेशान्वये तपास पथकातील सहा.पोलीस निरीक्षक चांगदेव सजगणे, पोलीस उप-निरीक्षक रविंद्र कस्पटे, पोलीस अंमलदार भांदुर्गे, तनपुरे,मोराळे,लाहीगुडे,घुले, शेख, पवार, चव्हाण, खेंदाड,टोणपे, शिंदे व दुधे यांनी केली आहे.

